30

# भारताच्या शेजारी देशांना चीनकडून दिली जाणारी लष्करी मदत व व्यूहात्मक संबंध

- **गोरख नामदेव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक,
संरक्षण शास्त्र विभाग,
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा, जि. बीड.

**प्रस्तावणा :- (Introduction)**

आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्राचे हित (National Intrest) आणि राष्ट्रीय सुरक्षाविषयक धोरण (National Security Policy) यावर संबंधीत राष्ट्राचा विकास आणि अस्तित्वही अवलंबून असते. सर्वच राष्ट्रे आर्थिक, राजकीय, सामरिक व भू-राजकिय ध्येय धोरणे राबवित असतात. भारताचे लोकशाही धोरण तर चीनने साम्यवादी विस्तारवादी धोरण अंगीकारले. त्या अनुषंगाने सीमांची पुनर्रचना करायला सुरुवात केली. त्यासाठी पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार आणि भारताशी बोलणी सुरु केली. ही बोलणी केवळ सीमाप्रश्नी नव्हती, तर आपला गेलेला परिसर परत मिळण्याची आकांक्षा त्यात दडलेली होती. या महत्वकांक्षेपोटी माओ-त्से-तुंग-तिबेटला हाताच्या तळव्याची आणि लडाख, सिक्कीम, नेपाळ, भूतान आणि अरुणाचल प्रदेश यांना तळाच्या बोटाची उपमा देत असत आणि देशवासियांना स्वतंत्र करण्याचे आवाहन करत असत.

चीनला महत्वकांक्षी विस्तारवादासाठी भारताविरोधी प्रभाव वाढवायचा आहे. चीन आशिया खंडात वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्या गटात समाविष्ट करत प्रत्येक राष्ट्राला लष्करी व पायाभूत सुविधेच्या उभारणीत गुंतला आहे. तसेच या देशांना आपलेसे करत चीन भारताला एकाकी पाडून दक्षिण आशियात भारत आणि पाकिस्तान असा सत्तेचा समतोल राखण्याचे चीनचे उद्दिष्ट आहे. म्हणून पाकचे पारडे कमी पडतेय हे लक्षात आले की, त्याला आधार देण्याचे चीनचे धोरण आहे. भारताने आपले परराष्ट्र धोरण मात्र पाकिस्तान भोवतीच घुटमळत राहिल्याने भारताची शक्तीही मर्यादित झाली आहे. किंबहुना भारताला दक्षिण आशियापुरताच तेही उपखंडापुरतेच मर्यादित ठेवण्याचा चीनचा मनसुबाही यशस्वी ठरला आहे.

भारताने प्रगत व विकसीत होऊ नये म्हणून चीन सीमावादाचा मुद्दा सतत घोळवत ठेवून भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत असतो व भारताच्या शेजारी पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांग्लादेश आणि मालदीव या देशांना लष्करी व पायाभूत सुविधांची मदत करुन आशियायी आणि जागतिक पातळीवर भारताची घौडदौड हाणुन पाडून व

दक्षिण आशियातील सत्तासमतोल साधुन चीन एकमेव शक्ती म्हणून पुढे येत आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या शेजारी देशांना चिनकडून लष्करी मदत व सामरिक संबंधाचा अभ्यास केला जाणार आहे.

* **संशोधनाचा उद्देश (Objective Research) :-**

१. भारताच्या शेजारी देशांना चीनकडून दिली जाणाऱ्या लष्करी व पायाभूत सुविधांच्या मदतीचा अभ्यास करणे.

२. भारताला स्थानिक संघर्षात गुंतवून ठेवण्यासाठी दक्षिण आशियातील चीनच्या भारताविरोधी व्युहात्मक संबंधाचे अध्ययन करणे.

* **गृहितके (Hypothesis) :-**

१. भारताने आपल्या शेजारी पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांग्लादेश आणि म्यानमार या देशांना चीनकडून देण्यात येणाऱ्या लष्करी मदत व सामरिक संबंधाकडे फारसे लक्ष दिले नाही असे दिसून येत नाही.

२. भारताने आपले लष्करी व परराष्ट्रीय धोरण केवळ पाकिस्तान पुरतेच मर्यादित ठेवलेले दिसून येते.

* **संशोधन पध्दती (Research Methodology):-**

भारताच्या शेजारी देशांना चीनकडून देण्यात येणारी लष्करी मदत व व्युहात्मक संबंध या शोध निबंधावर अध्ययन करण्यासाठी व्यवहारिक संशोधन (Applied Research) पध्दतीचा अवलंब करुन द्वितीयक सामग्रीच्या आधारे संशोधनात्मक लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिके इत्यादींचा आधार घेण्यात आला.

* **भारताच्या शेजारी राष्ट्रांना चीनची लष्करी मदत व व्युहात्मक संबंध :-**

भारताविरुध्द चीनची शत्रुत्वाची मुळे इतिहासात दडलेली आहेत. चीनमधील सत्ताधिशांनी कौटिल्यनीतीचा अवलंब करुन शेजाऱ्यांशी शत्रुत्व तर दुसऱ्यांशी मैत्री केली जाते. याचाच एक भाग म्हणून भारताच्या शेजारी देशांसोबत मैत्री संबंधाचा मार्ग अवलंबलेला दिसून येत आहे. ते पुढीलप्रमाणे -

**१. पाकिस्तानला लष्करी मदत व व्युहात्मक संबंध :-**

आशिया खंडात विशेषतः दक्षिण आशियामध्ये चीनला भारताविरोधी प्रभाव वाढविण्यासाठी पाकिस्तानला स्वतःच्या गटात समाविष्ठ करुन लष्करी मदत व व्युहात्मक संबंध वृध्दिंगत करण्यात गुंतला आहे. भारतीय सीमेवर वारंवार घुसखोरी करणारे पाकिस्तान आणि चीन दिवसेंदिवस एकमेकांच्या अधिक जवळ येत असून भारतासाठी मोठी डोकेदुखी बनली आहे. भारतासोबत आर्थिक हितसंबंध लक्षात घेवून सरळ वार करण्याऐवजी पाकला लष्करी दृष्टया अधिक सक्षम करुन भारताला अस्थिर करत दबाव निर्माण करण्याची चीनची योजना आहे. शिवाय भारत आणि पाक असा सत्तेचा समतोल राखणे हे चीनचे उद्दिष्ट आहे.

भारत-चीन मधील व्युहात्मक वितुष्ट २००५ मध्ये अमेरिकेबरोबर होऊ घातलेल्या अणु सहकार्य करारानंतर भू-राजकिय चित्र बदलले आहे. त्यामुळे पुर्वेकडील सीमेवर भारताला सतत डिवचत भारताची घोडदौड रोखण्यासाठी

पाकच्या लष्करी विकासाला, क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाला आणि अंतिमत: अण्वस्त्र सज्ज होण्याला चीननेच सहकार्य करायला सुरुवात केली. जेएफ-१७ ही २५० लढाऊ विमाने ५०० कोटी डॉलर्सना विकत आहे. 'ग्वाडार' या नौदलासाठी बांधलेल्या बंदरात चीनची गुंतवणुक ४० कोटी डॉलर्सची आहे. कराची आणि चष्मा या दोन अणु प्रकल्पामध्ये एसीपी १००० न्युक्लिअर रिॲक्टरच्या उभारणीसाठी २० कोटी डॉलर्स मदत केली. या रिॲक्टर पासून पाकिस्तान ११००० मेगावॅट ऊर्जा निर्माण करणार आहे. म्हणूनच पाकिस्तान चीनला आपला सर्व ऋतुतला मित्र म्हणतो. परिणामी चीनच्या राजकिय नेतृत्वाने आंतरराष्ट्रीय संबंधात जगात काहीही बदल झाले तरी चीन आणि पाकिस्तान हे सदैव उत्कृष्ट शेजारी, उत्तम मित्र, उत्कृष्ट भागीदार आणि सर्वोत्कृष्ट मित्र म्हणूनच राहतील.

**२. नेपाळशी वाढते व्यूहात्मक संबंध :-**

नेपाळमधील भारताच्या प्रभावाला चीनकडून आव्हान मिळत आहे. चीन आणि नेपाळ यांच्यातील संबंध सुधारले असून तिबेटबाबत नेपाळ प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. याची दक्षता चीनने घेतली आहे. नेपाळच्या ८३००० मेगावॅट जलविद्युत क्षमतेवर चीनचा डोळा आहे. गेल्या वर्षभरात चीनच्या ३८ शिष्टमंडळांनी नेपाळचा दौरा केला. याशिवाय नेपाळमधील चीनी दुतावासाच्या मदतीने नेपाळ-चायना म्युच्युअल कोऑपरेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. तसेच नेपाळला लष्करी मदतीसाठी २६लाख अमेरिकी डॉलरचा निधी जाहीर केला. याशिवाय आर्थिक मदतीतही वाढ करुन २.१९ कोटी डॉलरववर नेली आहे. या दोन्ही देशात सुमारे चाळीस कोटी डॉलरचा व्यापार होतो. नेपाळला जोडणारे तिबेट आणि काठमांडू यांना जोडणरा नजीकचा रस्ता बांधत आहे. या व्यतिरिक्त नेपाळमधील जलविद्युत प्रकल्पासाठी चीनने १८.७ कोटी कर्ज दिले आहे.

नेपाळमधील माओवादी चीनच्या पडद्याआड लपुन भारताकडे डोळे वटारुन बघत आहेत. माओवाद्यामध्ये भारत द्वेष पसरविण्याचे काम चीन कडून केले जात आहे. पुष्पदहल कमल ऊर्फ प्रचंड समर्थक माओवादी वैचारिक दृष्टीने चीनला आपला निकटचा सहकारी तर भारताला आपला शत्रु मानतात. परिणामी चीनने नेपाळमध्ये भारतीय सीमेपर्यंत रस्ते आणि रेल्वे मार्गाचे जाळे विणुन सर्व बाजूंनी भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न ड्रॅगन करत आहे.

*** भूतानशी मैत्री संबंध :-**

जून २०१२ मध्ये रिओ येथे झालेल्या राष्ट्र प्रमुखाच्या पर्यावरणविषयक परिषदेत भूतानचे पंतप्रधान जिग्मी थिनले आणि वेन जिआबाओ यांची भेट झाली या भेटीत चीनने भूतानला नानाविध प्रलोभने दाखविली आहेत.

*** मालदीव व बांग्लादेशात व्यूहात्मक सहकार्य :-**

भारताच्या अगदी जवळ मोक्याच्या जागी असलेला मालदीव आता चीनच्या कचाटयात सापडू पाहत आहे. मालदीवमध्ये चीनचा दुतावास सुरु करण्याचा विचार आहे. या व्यतिरिक्त भारताच्या जवळ इहवांधू व मारांधू या बेटावर बंदरे विकसीत करण्याचा चीनचा डाव आहे. तसेच पाणबुडयांचाही एक तळ तयार करणे, त्याचबरोबर क्याकफ्यु बंदराची निर्मिती करुन हिन्दी महासागरातील अस्तित्व चीनने निर्माण केले. शिवाय हतिनांधु येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधून देण्याची तयारीही चीनने दाखविली आहे.

बांग्लादेशाला लष्करी व पायाभूत सुविधांची मदत दिली जात आहे. चितगाव बंदराच्या विकासासाठी मोठी आर्थिक मदत चीनकडून देण्यात येत आहे.

थोडक्यात चीनने पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांग्लादेश व मालदीव या राष्ट्रांमध्ये लष्करी मदत आणि व्यूहात्मक धोरण वृध्दिंगत करुन दक्षिण आशियातील भारताचा लष्करी व सामरीक समतोल ढासळण्यासाठी व भारताला सामरीक घेराव घालण्याची महत्वाकांक्षी योजना आहे.

## * निष्कर्ष (Conclusions) :-

१. भारताने आपल्या शेजारी देश पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांग्लादेश व मालदीवमध्ये चीनच्या व्यूहात्मक नितीकडे फारसे लक्ष देण्यात आलेले नाही.

२. भारताने आपले लष्करी व परराष्ट्रीय धोरण केवळ पाकिस्तान पुरतेच मर्यादित ठेवल्याने चीनशी लष्करी समतोल साधण्यात भारताने पाहिजे त्या प्रमाणात प्रयत्न केला नाही.

३. दक्षिण आशियात भारताविरुध्द पाकिस्तान असा सत्तेचा समतोल साधुन भारताला दक्षिण आशियात तेही उपखंडापुरतेच मर्यादित ठेवण्याचा चीनचा मनसुबाही यशस्वी ठरला आहे.

४. भारताने चीनशी लढण्यापेक्षा स्वतःच्या सीमा बळकट करण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

५. दक्षिण आशियात चीन हीच एकमेव शक्ति म्हणुन पुढे येत आहे.

## * संदर्भ :-

१. पाल शिवम, आंतरराष्ट्रीय संबंध, वंदना पब्लिकेशन, नवी दिल्ली.
२. तोडकर बी.डी. भारताचे परराष्ट्रीय धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षा.
३. Mohd. Wasim, China India Border Conflict, Prashant Publishing House, Delhi.
४. www.googal.com
५. संरक्षण मंत्रालय वार्षिक अहवाल
६. Difence Digest & Strategic Analicies
७. Patrick M. Cronin, Global Strategic Assessment, Manas Publications, Delhi.